पोलीस अधीक्षक कार्यालय,वजिराबाद चौक नांदेड

EMAIL ID:- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


# प्रेसनोट

दिनांक–23.05.2025

## सिटी स्ट्रिट सेफ्टी पथकाची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे,दारू पिणाऱ्यांसाठी जागा उपलब्ध करून देणारे यांचेवर धडक कारवाई..

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने मा. **श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख **सपोनि श्री भागवत नागरगोजे** व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक 22 मे 2025 रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे व दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देणारे इसमांवर करण्यात आलेली कारवाई खालील प्रमाणे

1) **पोलीस स्टेशन विमानतळ** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान नागार्जुन हॉटेल जवळ ऑमलेट गाडयावर एक इसम हा लोकांना दारू पिणेसाठी जागा उपलब्ध करून देत असताना मिळून आल्याने त्याचेवर पोलीस स्टेशन विमानतळ येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 68 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आनंद नगर रोडवर 02 इसम सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन विमानतळ येथे म.पो.का.कलम 110/117 प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

2) **पोलीस स्टेशन शिवाजीनगर** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान ज्योती टॉकीज रोडवर 01 इसम सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचेवर पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे म.पो.का.कलम 110/117 प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

3) **पोलीस स्टेशन भाग्यनगर** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान नक्षत्र मंगल कार्यालय जवळ रोडवर 01 इसम सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्यांचेवर पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे म.पो.का.कलम 110/117 प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

4) **पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक,दोन, तीन मधील पोलीस अंमलदार यांनी पेट्रोलिंग दरम्यान ढवळे कॉर्नर, दुध डेअरी परीसरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असलेल्या 02 इसमास ताब्यात घेवून त्यांचेवर पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे म.पो.का.कलम 110/117 प्रमाणे कारवाई करण्यात आली

5) **पोलीस स्टेशन वजिराबाद** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान कोर्ट परीसर व छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ 03 इसम सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्याचेवर पोलीस स्टेशन वजिराबाद येथे म.पो.का.कलम 110/117 प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये, तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये, व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये, अन्यथा संबधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहण केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड